CR-1646-22-r-

## जिल्हा ग्राम विकास निधीच्या गुंतवणूकीबाबत

महाराष्ट्र शासन,
ग्राम विकास व जलसंधारण विभाग,
परिपत्रक क्रमांक-व्हीपीएम-२६०१/प्र.क्र.१६४३/२२,
मंत्रालय,मुंबई -४०० ०३२. दिनांक ९ जानेवारी २००२

वाचा :- शासन परिपत्रक क्र-व्हीपीएम-२६००/प्र.क्र.१०७१/२२
दिनांक २२ नोव्हेंबर २०००

**शासन परिपत्रक :-** मुंबई जिल्हा ग्राम विकास निधी १९६० चे कलम ५ अन्वये जिल्हा ग्राम विकास निधीमधील रक्कमा गुतंवणे व पुन्हा गुतंवणेबाबत तरतूद करण्यात आलेली आहे. तथापि, सदर गुंतवणूक योग्य प्रकारे होत नसल्यामुळे, त्याबाबत महालेखाकार (लेखा परिक्षा ) मुंबई यांनी वेळोवेळी आक्षेप घेतलेला आहे. त्यासाठी सदर निधीमधील रक्कमा विनावापर न ठेवता सदर रक्कमांची योग्य प्रकारे कशी गुंतवणूक करता येईल याबाबत उपरोक्त २२ नोव्हेंबर २००० च्या परिपत्रकान्वये शासनाने सूचना दिलेल्या आहेत.

जिल्हा ग्राम विकास निधीमधील मागील ३ वर्षाच्या सरासरी Withdrawls च्या दीडपटीपेक्षा जास्त रक्कमा Current Account मध्ये राहणार नाहीत याची सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दक्षता घ्यावी अशा सूचना उपरोक्त परिपत्रकान्वये देण्यात आलेल्या आहेत. मात्र हा निधी चालू खात्यात ठेवण्याचे ठोस कारण दिसत नाही. कारण या खात्यातून दर दिवशी व दिवसातून अनेक वेळा पैसे काढण्याची गरज नसते. ही बाब विचारात घेऊन चालू खात्या ऐवजी (Current Account) सदर निधीमधील मागील ३ वर्षाच्या सरासरी Withdrawls च्या दिडपटीपेक्षा जास्त रक्कमा Saving Account मध्ये राहणार नाहीत याची सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दक्षता घ्यावी अशा सूचना देण्यात येत आहेत. तसेच यापुढे जिल्हा ग्राम विकास निधीमधील रक्कमा Current Account मध्ये न ठेवता Saving Account मध्ये ठेवण्यात याव्यात अशाही सूचना देण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

( कुंदा गोसावी )
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,
सर्व विभागीय आयुक्त,
सर्व जिल्हाधिकारी,
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी.

C:\My Documents\RRS

Scanned with OKEN Scanner